नि.दी.खं.:-२५/२०१७
नि.क्र.५७

नि.दी.खं.:–२५/२०१७
नि.क्र.५७

नि.दि.दा.क्र.२५/२०१७
नि.५७ लगत
सुर्यकांत वि. माधव व इतर

<u>पुढील उलटतपास प्रतिवादीकरीता श्री पियुष सायरे वकील साहेब शपथेवर पुन्हा सुरुः</u>

२०. वाटण्या सन १९४९ साली झाल्या होत्या. वाद मिळकतीचा जुना क्र.१२८/१ होता व नविन क्रमांक ४३४ आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे क्र.८५, ८९/१, ११६ आणि १२८/१ अश्या ४ वेगवेगळया मिळकती होत्या. हे मला माहीत नाही ककी, सर्वे ११६ ही ५ एकर जमिन होती किंवा नाही. हे मी सांगु शकत नाही की, सर्वे क्र.११६ मध्ये रामचंद्र यांना २/३, रामराव, श्यामराव आणि जानराव यांना प्रत्येकी १/९ हिस्सा देण्यात आला होता किंवा नाही. हे मी सांगु शकत नाही की, रामचंद्रने त्याचा हिस्सा दानपत्राने नरेन्द्र जिनींग यांना दिला होता किंवा नाही. सन १९८२ साली माझे वय ३१ वर्ष होते. सन १९८२ साली माझे व माइया वडीलांचे चांगले संबंध होते. हे मला माहीत नाही की, सन १९८२ साली माइया वडीलानी नरेन्द्र जिनींग सोबत विक्री करार केला होता किंवा नाही.

२१. हे म्हणणे खरे नाही की, मी बाहेर गावी राहत असल्यामुळे माइया वडीलानी कोणते व्यवहार केले याबद्दल् मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, नरेन्द्र जिनींग यांच्याकडे माइया वडीलाची जमिन होती. माइया वडीलानी नरेन्द्र जिनींगला जमिन दिली होती. हे मी सांगु शकत नाही की, रामराव याने नरेंन्द्र जिनींगला जमिन देण्यास हरकत उपस्थित केली किंवा नाही. व्यंक्टराव यांना ५ मुले व २ मुली होत्या. श्यामराव यांना ४ मुली होत्या. हे म्हणणे खरे नाही की, श्यामराव यांच्या ४ मुलींचा वाद मिळकतीमध्ये हक्क आहे. पुष्पा आणि प्रभा यांची लग्न झाले आहे व त्यांना मुलाबाळ आहे.

प्रश्नः पुष्पा आणि प्रभा यांच्या वारसांना तुम्ही पक्षकार का केले नाही?

उत्तर. सन १९४४ साली रामराव आणि श्यामराव यांनी त्यांच्या वडीलांच्या असलेल्या मिळकती मोठे मुलगे म्हणून ताब्यात घेतल्या व इतर भावांना म्हणजे जानराव, राव

साहेब, अरविंद आणि आई अन्नापुर्णा तसेच दोन बहीणी विमल आणि कमल यांना मिळकतीतून काहीच दिले नाही. उत्पन्न देखील दिले नाही. त्यामुळे सन १९४९ साली सर्वांनी मिळून वाटप करण्याचे ठरविले व त्यानुसार सध्याची सर्वे क्र.४३४ ही मिळकत माझे वडील जानराव यांना मिळाली होती. ही सर्व गोष्ट माझ्या वडीलांनी मला सांगितली होती. त्यामुळे मी त्यांना पक्षकार केले नाही.

२२. माझ्या वडीलांनी जिवंत असतांना वरील गोष्टी सांगित्लया होत्या. माझे वडीलांचे शिक्षण ७वी पर्यंत झाले होते. हिस्सा मिळाला नाही किंवा अन्याय झालातर न्यायालयात जावे लागते याची कल्पना माझ्या वडीलांना होती. नि.६१ वरील सात बारा उता–यावर शोभा, प्रभा, अनिता आणि इंदिराबाई यांची नावे दाखल आहे, असे म्हणणे बरोबर होईल. हे म्हणणे खरे आहे की, सात बारा उता–यावरील नोंदीनुसार मी इतर लोकांना दाव्यात पक्षकार केले आहे. शोभा, प्रभा, अनिता आणि इंदिराबाई यांना दाव्यात पक्षकार केलेले नाही कारण, त्यांचा दावा मिळकतीशी काही संबंध नाही, तसेच इंदिराबाई ही इतर तिघींची आई आहे व ती मयत झाली आहे, तसेच प्रभा आणि पुष्पा यादेखील मयत झाले आहे. माझ्या म्हणण्यानुसार श्यामराव, रामराव, रामचंद्र आणि सिताराम यांचा वाद मिळकतीशी काही संबंध नाही केवळ जानराव यांचा मिळकतीशी संबंध आहे.

२३. श्यामरावची मुलगी अनिता हिला दाव्यात पक्षकार केले आहे कारण की, तिचे नाव ७/१२ उता–यावर दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, अनिता प्रमाणे इंदिराबाई, पुष्पा आणि प्रभा यांची नावे देखील ७/१२ उता–यावर दाखल आहे. हे म्हणणे खरे नाही की, हेतुपुर्वक मी आवश्यक पक्षकार दाव्यात शामील केलेले नाही. तोंडी वाटणीनुसार नावे महसुल अभिलेखात दाखल होण्यासाठी माझ्या वडीलांनी कोणते प्रयत्न केले हे मी सांगु शकत नाही. मी भुमी अभीलेख कार्यालयाकडे तसेच पटवा–याकडे नावे नोंदणीसाठी व कमी करण्यासाठी अर्ज वडील हयात असतांना केले होते. नावे कमी झाले नाही म्हणून मी हा दावा दाखल केला आहे.

२४. ७/१२ उता–यातील नोंदी व त्या समोरील नमुद हिस्से चुकीचे आहे. मी ७/१२ उता–यावर असलेल्या नोंदी कमी करण्यासाठी उपविभागीय अधिका–याकडे अपिल केले नाही कारण त्या नोंदी माझ्या जन्माच्या आदीपासून आहे.

प्रश्नः तुम्हाला समजायला लागल्यापासून ७/१२ उता–यावरील नोंदी का आहवानीत केले नाही ?

उत्तरः सन १९८२ साली रामचंद्राने तहसीलदाराकडे वाटणी करीता अर्ज केला होता मात्र दोन वर्ष सुनावणी झाल्यानंतर प्रकरण दिवाणी न्यायालयाचे अधिकार कक्षेतील आहे असा निर्णय दिला. मात्र त्यांनतर कोणी त्यावर अपिल केली नाही मात्र मी हा दावा नावे कमी करण्यासाठी केला आहे.

२५. माझे वडीला जानराव सन २०१६ साली मयत झाले. माझ्या वडीलांनी हयात असतांना दिवाणी दावा दाखल केला नाही. रामचंद्राच्या वारस नोंदीकरीता मी हरकत उपस्थीत केली होती. श्यामराव आणि रामराव यांच्या वारसांच्या नोंदी करीता मी हरकत उपस्थीत केली नाही मात्र हा दावा दाख्ल केला आहे. रामचंद्रच्या वारसांची नोंद झाल्यानंतर मी अपिल केली नाही मात्र हा दावा दाखल केला आहे. रामचंद्र केंव्हा मयत झाले हे मला माहीत नाही. रामचंद्राच्या वारसाच्या नावे दावा दाखल करण्यापुर्वी नोंद झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२–०७–१९८२ रोजी माझ्या वडीलानी रामरावला ०.५५ आर जमिन त्यांचा हिस्सा नरेन्द्र जिनींगला विक्री करणार असल्याचे कळवले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१० ते २०१६ पर्यंत वाद मिळकतीचा शेतसारा पावत्या रामचंद्राच्या नावे येत होत्या.

उलटतपास तोंडीविनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत

(ओ.जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.
दिंनाक:१८/०७/२०२३

समक्ष

(ओ.जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.